# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १७.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १६/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ७४,४००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.१६/११/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली ग्रा. येथे ०२ तसेच पोस्टे आ. बाळापुर येथे ०१ अशा एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ९,२००/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.